# Prabhat

## Demag Cranes opens new plant in Chakan

**Date: 13-07-2010 | Edition: Pune | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 12 H: 9**

**Clip: 1 of 1**


# डिमॅग क्रेन्सचे चाकणमध्ये विस्तारीकरण

पुणे, दि. १२- आठ महिन्यांच्या विक्रमी कालावधीत पहिल्या टप्प्याचे बांधकाम पूर्ण करत डिमॅग क्रेन्सने आज त्यांच्या भारतातील नवीन उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन चाकण येथे केले. यामुळे आता कंपनीची क्षमता वाढून ती ८००० चौरस मीटर झाली असून एकूण १०४०० चौरस मीटर बनली व आता या व्यतिरिक्त ६०० चौरस मीटर क्षेत्र यामध्ये वाढू शकेल.

सर्वसाधारण क्रेन्सचे सुटे भाग आणि क्रेन्सच्या उत्पादनाबरोबरच भविष्यात आता अधिक जटील आणि तांत्रिकदृष्ट्या कठिण अशा क्रेन्सची निर्मिती या एका उत्पादन क्षमतेत करण्यात आली असून यामुळे आता ग्राहकांच्या गरजांनुसार क्रेन्सची निर्मिती करणे शक्य होईल.

डिमॅगची हा प्रकल्प पुण्यापासून ३० किमी अंतरावर असून या




**डिमॅग क्रेन्सचे समूह सीईओ थॉमस हॅगेन व डिमॅग इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास बक्षी.**

प्रकल्पाचे डिझाईन वर्षाला ६०० पर्यंत स्टॅन्डर्ड क्रेन्स तसेच १०० प्रोसेस क्रेन्स तयार करण्याची आहे. या क्षमतेमध्ये केबीके क्रेनची कन्स्ट्रक्शन किटचे उत्पादनही येथे करण्यात येणार असून अशा प्रकारच्या केबीके क्रेन्सच्या रेल्सचे २४ किमी पर्यंतच उत्पादन वर्षाला करता येईल. मार्चपासून सुट्या भागांच्या दळणवळणाचे कामही येथूनच सुरू राहणार आहे. केबीकेसाठी आवश्यक असणाऱ्या रोप होईस्ट आणि ओपन विन्च क्रॅब्ससारख्या सुट्या भागाचे उत्पादन याआधीच सुरू करण्यात आले आहे. कंपनी जे सुटे भाग उत्पादित करत नाही अशाकरता कंपनीतर्फे स्थानिक पुरवठादारांची मदत घेतली जाणार आहे.

डिमॅग क्रेन्स एजीच्या संचालक मंडळाचे सभासद आणि ग्रूपचे मुख्य कार्य अधिकारी थॉमस हॅगेन यांनी स्थानिक पातळीवरील प्रोसेस क्रेन्सच्या उत्पादनाविषयी बोलताना सांगितले. 'या नवीन प्रकारच्या क्रेन्स अधिक उत्पादनक्षम आणि भारत तसेच जर्मनीतील इंजिनियर्सने केलेल्या नाविन्यपूर्ण भागिदारीचे प्रतिक असून या क्रेन्स विशेष करून भारतीय बाजारपेठेसाठी व त्यांच्या खरेदीच्या संधीसाठी तयार करण्यात आल्या आहेत. भारतातील डिमॅग क्रेन्स या उपकंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुहास बक्षी म्हणाले की, आमच्या उत्पादन क्षमतेतील वाढीमुळे बाजारपेठेतील आमचे स्थान अधिक मजबूत करण्यास मोठी मदत होऊ शकेल.